**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ८९/२०१८-१९/१७५ दिनांकः २३०९.२०१९

**आदेश**

**आदेश केस क्र. ८९ (२०१८-२०१९)**

**तक्रारदार -** मं. मेनन पिस्टन लि.
प्लॉट क्र. १९७ टोप
ता. हातकणंगले जि. कोल्हापूर — **अर्जदार**

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर — **पक्षकार**

२) कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
जयसिंगपूर विभाग, जयसिंगपूर

**कोरमः**-१.श्रीमती पुष्पा एस तावडे, अध्यक्ष
२.श्री. राजेंद्र ल. हजारे, सदस्य सचिव,
३. श्री. प्रशांत श. पुजारी, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्यायनिर्णय**

अध्यक्ष, ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

प्रस्तुतची तक्रार तक्रारदार कंपनीने विज जोडणी उभारण्याकरता त्यांनी केलेल्या खर्चाचा परतावा व्याजासह मागण्या करता दाखल केलेली आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

## ग्रा-हाण्यांचे स्वरुप

थोडक्यात हकीकत अशी की, तक्रारदार कंपनी वर नमूद केलेल्या पत्यावर उच्च दाब औद्योगिक विद्युत ग्राहक असून त्यांचा HT-I-A, Industrial consumer No. 250249302232 असा ग्राहक क्रमांक आहे. तक्रारदारांनी आवश्यक तो सर्व तपशील आपल्या तक्रार अर्जाच्या परिशिष्ट "अ" मध्ये दिलेला आहे.तक्रारदारांची सुरवातीची कॉन्ट्रक्ट डिमांड 1500 KVA ची होती. तथापी दिनांक १०.०२.२००८ आणि दि.२०.०५.२०११ अर्जानुसार तक्रारदार कंपनीने वाढिव विज भाराची मागणी अर्ज विज वितरण कंपनीकडे दाखल केला. तो अर्ज त्यावेळेचे अधीक्षक अभियंता म.रा.वि.वि.कं. मर्या. कोल्हापूर मंडल कार्यालय कोल्हापूर यांनी मंजूर करुन SE/KPC/T/AE-1/NO.7256 दिनांक ११.११.२००९ चे पत्राने १९००KVA MD आणि SE/KPC/T/AE-1/NO.6064 दिनांक ११.०८.२०११ चे पत्राने ४९९०KVA MD ३३ KVA लेव्हलचा वाढिव लोड मंजूर करणारे पत्र दिले. पहिल्या वाढिव विज भाराकरिता कार्यकारी अभियंता जयसिंगपूर यांनी दि.०७.१०.२००९ चे पत्र क्र. ५९६५ नुसार ६,६५,७५३/- अंदाजपत्रक दिले. तर दुस-या वाढिव विज भाराकरिता पत्र क्र. ४४०७ दिनांक २६.०७.२०११ चे पत्राने रु. १,७८,०८५/- चे अदांजपत्रक दिले. दोन्हीही वाढिव विज भाराकरिता तक्रारदार कंपनीने दिनांक ०२.०१.२०१० रोजी १.३ टक्के दराने सुपरव्हीजन चार्जेस रक्कम रु. ८,६००/- तर त्याच दराने माहे ऑगस्ट -२०११ मध्ये रक्कम रु. २२९०/- इतके सुपरव्हीजन चार्जेस भरले. प्रथम वाढिव विज भाराकरिता पायाभूत सुविधा उभारणीचे काम तक्रारदार कंपनीने सप्टेंबर २०१० तर दुस-या वाढिव विज भाराकरिता पायाभूत सुविधा उभारणीचे काम मे-२०१२ मध्ये पुर्ण केले. ऑक्टोंबर २०१० या देयके महिन्यापासून पाहिला वाढिव विजभार तर मे-२०१२ या महिन्यापासून दुसरा वाढिव भार अधीक्षकअभियंता कोल्हापूर यांनी चालू केला.

तक्रारदारांचे कथनानुसार सिव्हील अपिल क्र. ४३०५/२००७ हया, विज वितरण कंपनीने मा. सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्र विज आयोग आणि इतर यांच्या विरुध्द दाखल केलेल्या अपिलात ग्राहकाने केलेल्या पायाभूत आराखडा रक्कमेच्या परताव्या सबंधीचा मुद्दा, प्रलंबित होता. तथापि सदरचे अपिल मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १०.११.२०१६ रोजी फेटाळून लावले, व त्यानुसार Non-DDF योजने खालील पायाभूत सूविधा आणि मिटरींगंचे काम या करता ग्राहकंने केलेला खर्चाचा परतावा ग्राहकाला विज वितरण कंपनीकडून मिळण्याचा हक्क आहे, हे कायदयाचे सुत्र प्रस्तापित झाले. त्या निकालानुसार विज वितरण कंपनीने दिनांक १२.१०.२०१७ रोजी CE/Dist/D-IV/MERC/25079 या क्रमांकाचे परिपत्रक काढून SLC, ORC,and meter cost ग्राहकंाना परत करण्या संबंधी सूचना जारी केल्या. त्यानंतर तक्रारदारांनी दिनांक १२.०६.२०१८ रोजी अधीक्षक अभियंता म.रा.वि.वि.कं.मर्या. कोल्हापूर यांचेकडे अंदाजपत्रकीय खर्च रु. ६,६५,७५३/- व रु. १,७८,०८५/- व त्यावर व्याजाची मागणी केली. तथापि आजतागायत वि.प.कंपनीकडून परतावा मिळालेला नाही, किंवा काही उत्तरपण मिळालेले नाही. सबब तक्रारदार कंपनीने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर मंडल कोल्हापूर यांचेकडे दिनांक २४.०९.२०१८ रोजी तक्रार दाखल केली असता सदर कक्षाने ती तक्रार त्यांच्या दि. २२.११.२०१८ च्या निर्णयाने ना मंजूर केलेली आहे. ग्राकांचे अंतर्गत तक्रार निवारण कक्षाच्या निर्णयाने समाधान न झाल्याने ग्राहकाने या मंचाकडे नमुना 'अ' मध्ये या मंचापुढे अर्जकेला व खालील मुद्दयावर न्याय मिगितला.

१) तक्रारदारास दिलेली जोडणी ही महाराष्ट्र विद्युत नियामकं आयोग (वितरण परवाना धारकांच्या कृतीची मानके ) विनियत २०१४ व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग पुरवठा २०१४ व संबंधीत महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग विनिरयम २००६ नुसार Non DDF म्हणून घोषित करावी.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. KOLHAPUR ZONE
महावितरण

२) एकूण पायाभूत सुविधा खर्च रु. ६,६५,७५३/- व रु. १,७८,०८५/- फेब्रुवारी २०१२ ते खर्च परत मिळेपर्यन्तच्या कालावधीकरिता व्याज बँकेच्या दराप्रमाणे मिळावे.

३) अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने सदरची तक्रार विहित मुदत निर्णित न केल्याने दर आठवडयास रु. १००/- प्रमाणे दिनांक ०१.०७.२०१८ पासून भरपाई मिळावी.

तक्रारदार कंपनीने आपल्या मागणी प्रित्यर्थ खालील मुद्दे मांडलेले आहेत.

१. तक्रारदारांनी मंजूर अंदाजपत्रकानुसार सन-२०१० मध्ये आधिच आस्तित्वात असलेल्या ११के.व्ही.ए. लाईन चा बदल करुन ३३ KV उच्च दाब विद्युत वाहिनीचे काम केले. व केवळ Tapping केले. दुस-या वाढिव विज जोडणीच्या वेळेला सन-२०१२ मध्ये केवळ मीटररिंग क्यूबिकलचे काम केले. म.रा.विज नियमाक आयोगाच्या Schedule of charges केस क्र. ७०/२००५ मध्ये दिनांक ०८.०९.२००६ चा निकाल व त्या अनुषंगाने म.र.वि.वि.कं. काढलेल्या परिपत्रक क्र. ४३ दिनांक २७.०९.२००६ नुसार मिटर बसविण्याची जबबादारी ही परवाना धारक विज वितरण कंपनीची असून जर ग्राहकाकडून Meter Cost वसूल केली असेल तर ती ग्राहकांस परत करण्याबद्दल सूचना देण्यात आलेल्या आहेत.

२. ज्या विद्युत वाहिनीवरुन तक्रारदारांस विज जोडणी देण्यात आलेली आहे ती विज वाहिनी २२०/३३ KV. वाठार उपकेंद्र, कोल्हापूर पासून सुरु होत असून तिचे नाव ३३ KV , मोहिते टेक्स्टाईल फिडर असून ही विद्युत वाहिनी आधि पासून आस्तित्वात होती. व त्या विद्युत वाहिनीला तक्रारदार कंपनीने केवळ extension व Coversion केलेले आहे..

३. सदर ३३ KV. फिडर वरुन इतरही ग्राहक जसे की, जसे की आर. एम. मोहिती टेक्स्टाईल , महात्मा फुले मागासवर्गीय स्पिनिंग मिल्स लि. ,D.N. Wind इत्यादी असे अनेक विद्युत ग्राहकांना विज पुरवठा केला जात आहे.

४. महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाच्या केस क्र. ५६/२००७ मधील दिनांक १६.०२.२००८ च्या निकालानुसार जर आधी आस्तित्वात असलेल्या विद्युत वाहिनीचा विस्तार केला असेल (extension) किंवा tapping केले असेल तर ती विद्युत वाहिनी किंवा तिचा विस्तार हे ग्राहकाधिष्टीने वितरण सुविधा Dedicated Distrubution Facillity योजने खाली येत नाही.

५. DDF योजनेच्या, राज्य विज आयोगाच्या विविध निकालातील आणि विनियमातील दिलेल्या व्याख्येनुसार तक्रारदारांना दिलेली विज जोडणी DDF योजने खाली येत नाही , व ती स्पष्टपणे Non-DDF योजनेत बसते. त्यानुसार तक्रारदारांना त्यांनी अंदाजपत्रकानुसार केलेला खर्च परत मिळण्याचा हक्क आहे.

६. म.रा.विद्युत आयोगाने केस क्र. ८२/२००६ मधील दिनांक १७.०५.२००७ चे आदेशांने विज वितरण कंपनीला ज्या ग्राहकांकडून विद्युत वितरण विनियम २००५ मध्ये नमूद केलेले खर्च सोडून इतर रक्कमा जसे की ,ORC/ ORC-P/ SLC, Cost of Meter इत्यादी रक्कमा व्याजासह परत कराव्या असे आदेश दिलेले आहेत.

७. त्याच केसमध्ये म.रा.विज आयोगाने आपल्या दिनांक २१.०८.२००७ चे आदेशांने आपल्या दिनांक १७.०५.२००७ च्या आदेशांचे पालन न झाल्याने म.रा.वि.वि.कं.वर दंड बसविला असून दिनांक २७.०५.२०१० चे आदेशांचे पालन करावे असे आदेश पारित केलेले आहेत.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

८. केस क्र. ५६/२००७ मध्ये म.रा.विज नियमाक आयोगाने ORC DDF आणि Non-DD यातील फरक व अर्थ , आपल्या दिनांक १७.०५.२०१७ च्या आदेशाने स्पष्ट केलेला आहे. सदरची केस वि.प. विज वितरण कंपनीनेच दाखल केलेली होती त्यामुळे सदरचे निकाल विज वितरण कंपनीवर बंधनकारक आहेत.

९. विज कायदा २००३ च्या कलम ६२(६) अनुसार जर एखादया परवाना धारक विज वितरण कंपनीने किंवा विज निर्मिती कंपनीने कलम ६२ नुसार निर्गमित केलेल्या टॅरिफ पेक्षा जास्त रक्कम वसूल केली असेल तर अशी जादाची रक्कम व्याजासह ज्याच्याकडून वसूल करण्यात आलेली आहे त्याला परत करण्याबाबत तरतूद आहे.

१०. म.रा.वि.वि.कं.चे दिनांक २०.०५.२००८ रोजीचे परिपत्रकानुसार Non-DDF योजने खाली दिलेल्या विद्युत जोडणी धारकांना त्यांनी केलेला खर्च परत करण्याचे आदेश दिलेले आहेत. जरी ते परिपत्रक लघु दाब ग्राहक करता असले तरी म.रा. विद्युत आयोगाचा आदेश हा लघु दाब व उच्च दाब ग्राहकांना करता आहे.

पुढे मुद्दे क्रमांक ११ ते १६ मध्ये तक्रारदार कंपनीने सुप्रीम कोर्टातील सिव्हील अपिल क्र.४३०५/२००७, त्यातील १०११/२०१६ चा आदेश, त्या नंतर विज वितरण कंपनीने काढलेले परिपत्रक क्र. CE/ Dist./ IV/MERC/ 25079 दिनांक १२.१०.२०१७मध्ये Supply Code Regulation कलम मधील विनियम क्र. व १९.१ विद्युत कायदा २००३ चे कलम ६२(६) यांचा उल्लेख करुन त्यांचा आधार घेतलेला आहे. यांचा उल्लेख आम्ही वर केलेलाच आहे. तक्रारदारांचे कथनानुसार SLC, ORC, व DDF हा वेगवेगळया नावाने ओळखले जाणारे पायाभूत आराखडा खर्चच आहे आणि केवळ जी ख-या अर्थानी DDF योजना असेल , ती वगळता इतर सर्व योजनांबाबत खाली ग्राहकांनी केलेला पायाभूत सुविधा खर्च , त्यांच्याकडून वसूल केलेले SLC ORC किंवा Meter charges हे ग्राहकांना परत करण्याची कायदेशीर जबबादारी विज वितरण कंपनीवर आहे. तक्रारदारांची तक्रार मुदतीत असल्याचे कथन करुन तक्रारदारांनी त्याची विद्युत जोडणी ही Non-DDF योजने खाली आहे. असे जाहिर करुन मिळावे तसेच वि. प. कंपनीने दिलेल्या अंदाजपत्रकानुसार रक्कम रु. ६,६५,७५३/- व रु. १,७८,०८५/- चा पायाभूत सुविधा बाबतचा खर्च तक्रारदाराला परत करण्याचा आदेश व्हावा व त्यावर ऑक्टोंबर २०१० व जुन २०१२ अनु.क्र. पासून रक्कम परत मिळेपर्यन्तच्या तारखेपर्यन्त बॅक दराप्रमाणे व्याजासह देण्याचा आदेश व्हावा. अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने सदरची तक्रार विहित मुदतीत निर्णित न केल्याने दर आठवडयास १००/- या दराने दिनांक ०१.०७.२०१८ पासून त्यास भरपाई मिळावी व न्याय हितार्त इतर आवश्यक ते आदेश पारित करावेत अशी मागणी केलेली आहे.

मंचाने दि. २५ जानेवारी २०१९ च्या पत्राने सदर तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग विनियम २००६ च्या विनियम ६.१२ व ६.१३ अतर्गत महावितरणास त्यांचे स्पष्टीकरण देण्यास सांगितले. त्यानुसार महावितरणने त्यांच्या दि. २ एप्रिल, २०१९ च्या पत्राने खालील प्रमाणे स्पष्टीकरण दिले.

प्रस्तुत प्रकरणांची नोटीस मिळाल्यानतर विज वितरण कंपनीने हजर होऊन दिनांक ०२.०४.२०१९ ला आपले लेखी म्हणणे अधीक्षक अभियंता कोल्हापूर मंडल, कोल्हापूर यांचेमार्फत दाखल केलेले असून त्यात तक्रारदारांची संपूर्ण मागणी नाकारलेली आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

**वि.प. कंपनीचे थोडक्यात म्हणणे खालील प्रमाणे आहे.**

1. At the very outset it is stated that without prejudice to our right to defend all the claims and aversions made by complainant are denied in toto specifically and generally except which are specifically admitted by respondent

2. It is respectfully submitted that, complainant is an industrial consumer of MSEDCL having connection No.250249302232. The said connection was released on dtd 15/03/1996. The consumer had released additional load in the year 2010 and 2012. It is bring to your kind notice that, at the time of releasing additional load, consumer has neither disputed about work done nor payment made against said connection.

3. Further , it is submitted respectfully that, In the year 2008 and year 2011, consumer had enhanced its load. It is most importantly noted that, on both occasions consumer had never disputed about infrastructure work cost till 2018. Even consumer had not showed its protest against said work in whatsoever nature. This shows that, consumer has willingly carried out said infrastructure work without any protest.

4. It is bring to your kind notice that, The MERC in case No. 82 of 2006 & 56 of 2007 is dealing with issue of refund of ORC, SLC etc. recovered during the period from 08th Sept, 2006 to 30th April, 2007. The matter before Hon'ble Supreme Court vide Civil Appeal No. 4305 of 2007 and stay order to refund is in respect of recovery of SLC charges during above period only. In the present matter complainant /consumer is asking for cost of DDF infrastructure . Both matters are distinguishable. The major points of differences between two matters are

(a) Matter before Hon'ble Supreme Court was dealing with specific period only, whereas present matter has no such binding

(b) Stay order granted by Hon'ble Supreme Court only for specific period for refund of ORC, SLC etc.

This shows that, current matter and the matter before Hon'ble Supreme Court has no relevance.

5. Complainant / Consumer has also quoted circulars issued by MSEDCL. In furtherance of same, it is bring to your kind notice that, said circulars also speak about specific period of refund to be given in r/o SLC, ORC and meter charges. With aforesaid discussion it is very much crystal clear that, present matter and matter before supreme court are very much distinct. Therefore, it also becomes clear that, consumer's aversion for waiting till finalization of Hon. Supreme Court decision for filling present grievance becomes baseless and limitation claimed by the consumer does not hold any water.

6. As per SOP 2014 –

" **Dedicated distribution facilities** " means such facilities, not including a service line, forming part of the distribution system of the Distribution Licensee which are clearly and solely dedicated to the supply of electricity <u>to a single consumer **or a group of consumers** on the same premises or contiguous premises ;</u>

The said definition clearly inclusive of Single Consumer or Group of Consumers on the same premises or contiguous premises. This definition make very much clear that, even there are more than one consumer on feeder, it will be treated as DDF. Also it is pertinent to note that, quality of supply is not disputed by the consumer.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

7. **That, as per MERC Supply Code,2005**

*3.3 Recovery of expenses for giving supply*

*3.3.1 The Distribution Licensee shall recover the expenses referred to in Regulation 3.2(a) above, in accordance with the principles contained in this Regulation 3.3 and based on the rates contained in the schedule of charges approved by the Commission under Regulation 18:Provided that the Distribution Licensee may, with the approval of the Commission, in case of any category of consumers, recover such expenses on the basis of an average or normative rate for providing the electric line or electrical plant for the purpose of giving supply.*

*3.3.2 Where the provision of supply to an applicant entails works of laying of service line from the distributing main to the applicant's premises, the Distribution Licensee shall be authorized to recover all expenses reasonably incurred on such works from the applicant, based on the schedule of charges approved by the Commission under Regulation 18:*

*Provided that the Distribution Licensee shall be entitled to use such service-line to supply electricity to any other person, notwithstanding that all expenses reasonably incurred have been recovered in accordance with this Regulation 3.3.2, except if such supply is detrimental to the supply to the consumer already connected therewith.*

***3.3.3 Where the provision of supply to an applicant entails works of installation of Dedicated distribution facilities, the Distribution Licensee shall be authorized to recover all expenses reasonably incurred on such works from the applicant, based on the schedule of charges approved by the Commission under Regulation 18.***

***3.3.4 Where the provision of supply to an applicant entails works, not being works referred to in Regulation 3.3.2 or Regulation 3.3.3 above, for augmentation of the distribution system, the Distribution Licensee shall be authorized to recover from the applicant such proportion of the expenses reasonably incurred on such works as the load applied for bears to the incremental capacity that will be created by augmentation of the distribution system:***

*Provided that where the load applied for does not exceed 25 per cent of the capacity that will be created by augmentation of the distribution system, the Distribution Licensee shall not be entitled to recover any expenses under this Regulation 3.3.4:*

*Provided further that any dispute with regard to the need for and extent of augmentation of the distribution system under this Regulation 3.3.4 shall be determined in accordance with the procedure set out in the Consumer Grievance Redressal Regulations.*

**3.3.8 Where the Distribution Licensee permits an applicant to carry out works under this Regulation 3.3 through a Licensed Electrical Contractor, the Distribution Licensee shall not be entitled to recover expenses relating to such portion of works so carried out by the applicant:**

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

**Provided however the Distribution Licensee shall not be entitled to recover, from the applicant, charges for supervision undertaken by the Distribution Licensee, at such rate, as may be approved in the schedule of charges under Regulation 18, not exceeding 15 per cent of the cost of labour that would have been employed by the Distribution Licensee in carrying out such works.**

8. Regulation 3.3.8 provides the option to the consumer with the permission of licensee to carry out the work through licensed electrical contractor and in that case licensee is allowed to recover the supervision charges not exceeding the 15 % cost of labour. In the present case applicant has suo moto exercised the option for carrying the work of infrastructure and MSEDCL recovered 1.3 supervision charges as allowed by the MERC as per schedule of charges. In view of the provision the complainant has applied for the supply under DDF scheme suo moto and submitted consent of DDF and hence the complainant was not entitled the refund of expenses incurred for carry out work as per estimate.

Consumer had willingly carried out the said work through the licensed electrical contractor due to its urgency therefore applicant consumer is not entitled a right to claim the refund of amount incurred on infrastructure.

**9. Limitation**

The claim of the complainant company is time barred and beyond limitation. As per Clause 6.6 of Consumer Grievance Redressal Forum & Electricity Ombudsman Regulations, 2006, provides that forum shall not admit any grievance unless it is filed within 2 years from the date on which the cause of action has arisen. Therefore, in view of the above mentioned clause claim of the consumer company is not maintainable.

That, the complainant in present case need not necessary to wait till the decision dtd.10.11.2016 of Supreme Court in Civil Appeal No.4305 of 2007.

That, after the dismissal of Civil Appeal in Supreme Court, the MSEDCL has issued various circular in Compliance of the order of Hon'ble MERC in case No.82 of 2006.The case of complainant was neither covered in said period i.e.20.01.2005 to 20.05.2008 nor has complainant produced the receipt of deposit under head of ORC/SLC etc of above period. It is pertinent to note that, issue involved before Hon'ble Supreme Court and issue involved in present matter are totally different. In matter before Hon'ble Supreme Court cost refund of infrastructure cost was only limited for certain period only ie from 20.01.2005 to 20.05.2008. Also matter before Hon'ble Supreme Court was pertaining to refund of ORC , SLC etc. Therefore ,by any stretch of imagination decision passed by Hon'ble Supreme Court in Civil Appeal No.4305 of 2007 cannot be made applicable to present matter.

As the matter before Supreme Court and present matter are different . consumer cannot be allowed to take shield or defense of the same to cover limitation period.

Further, as per 3.3.3 & 3.3.4 & 3.3.8 of Supply Code, the complainant was liable for expenses for DDF. Hence complainant was not liable for any refund at all.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

Consumer was given sanctioned letter bearing no 7256 dated 11/11/2009 and further given sanctioned on vide letter 6064 dated 11/08/2011. It is pertinent to note that consumer has not raised a single objection at the time of sanction or release of said connection. The cause of action arose at 2010 an 2012 respectively. However, consumer was not vigilant and didn't raised any dispute about the said issue of refund. Now after expiry of more than 5 to 6 years of cause of action consumer cannot claim refund as it is barred by Clause 6.6 of Consumer Grievance Redressal Forum & Electricity Ombudsman Regulations, 2006 which clearly states that complaint to be filed within 2 years from the date on which the cause of action has arisen.

In the support of above mentioned contentions of point of limitation MSEDCL relies on recent decision passed in Writ Petitions No 6859-62 of 2018 ( MSEDCL vs Javahar Shetkari Sahkari Sut Girani Ltd) by High Court Bombay, Aurangabad Bench dated 21 August 2018. The highlight of said order is reproduced below

*42. I have concluded on the basis of the specific facts of these cases that once the FAC Bill is raised by the Company and the said amount has to be deposited by the consumer to avoid disconnection of the electricity supply, the consumer cannot pretend that he was not aware of the cause of action. As such and in order to ensure that Section 42(5) r/w Regulation 6.2, 6.4, 6.6 and 6.7 coexist harmoniously, I am of the view that the consumer has to approach the Cell with promptitude and within the period of 2 years so as to ensure a quick decision on his representation. After two months of the pendency of such representation, the consumer should promptly approach the Forum before the expiry of two years from the date of the cause of action.*

*43. If I accept the contention of the Consumer that the Cell can be approached anytime beyond 2 years or 5/10 years, it means that Regulation 6.4 will render Regulation 6.6 and Section 45(5) ineffective. By holding that the litigation journey must reach Stage 3 (Forum) within 2 years, would render a harmonious interpretation. This would avoid a conclusion that Regulation 6.4 is inconsistent with Regulation 6.6 and both these provisions can therefore coexist harmoniously.*

10. **Jurisdiction**

It is submitted that a "Consumer Grievance" contemplated under the regulation is a basically complaint about fault or inadequacy in quality of performance of the licensee. The grievance raised by the appellant is not within the corners of grievance as defined in the regulation, so complaint is liable to be dismissed. Hon. Bombay High Court Nagpur bench in W.P.No. 2031/2011 (MSEDCL V/s. M/s.Kaygaon Paper Mills Ltd.) while dealing with the issue 'as to refund of amount' can be called grievance or not, has held that the dispute between the parties is of civil nature and would not be covered by the term grievance and finally held that the CGRF which has passed the impugned order apparently did not have jurisdiction to entertain a complaint of this nature.

11. Recently Hon'ble Ombudsman in Representation No 189,190 & 191 of 2018 has rejected the similar type of complaint regarding the refund of DDF amount claimed by consumer on limitation ground on the basis of aforesaid judgement of Hon'ble Bombay High Court (Copy enclosed herewith)

Therefore, It is humbly submitted that, the complaint be dismissed with cost

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. KOLHAPUR ZONE महावितरण

## सुनावणी व त्या दरम्यानचा युक्तिवाद

मंचाने याबाबत एकूण चार सुनावण्या घेतल्या त्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

१) प्रथम सुनावणी दिनांक ०२.०५.२०१९ रोजी घेण्यात आली कंपनीच्या वतीने श्री शैलेंद्र राठोर, अधीक्षक अभियंता (कोमं), श्री सागर मारुलकर, कार्यकारी अभियंता, कोल्हापूर मंडल कार्यालय, कोल्हापूर व तक्रारदारातर्फे त्यांचे प्रतिनिधी श्री प्रताप होगाडे, उपस्थित होते.

या सुनावणी दरम्यान प्रस्तुत तक्रार अर्जावर तक्रारदार कंपनीतर्फे कोणत्याही प्राधिकृत इसमाची अथवा प्रतिनिधीची स्वाक्षरी नाही असा आक्षेप घेऊन त्या कृतीकरिता प्रस्तुत तक्रार खारीज करावी असा युक्तिवाद करण्यात आला. त्यानंतर हा प्राथमिक मुद्दा काढावा व तो पहिला निर्णित करावा अशी मागणी करणारा अर्ज दाखल करण्यात आला. त्यामुळे सदर प्रकरणात मंचाने पुढील सुनावणी दिनांक २४.०५.२०१९ रोजी निश्चित केली.

२) द्वितीय सुनावणी दिनांक २४.०५.२०१९ रोजी घेण्यात आली त्या सुनावणी दरम्यान तक्रारदार कंपनीने प्रथम सुनावणीत मान्य केल्याप्रमाणे प्राधिकृत इसमाचे अधिकृत पत्र मंचासमोर सादर केले. तसेच सदर प्रकरणाबाबत तक्रारदार कंपनी व विज वितरण कंपनी यांचा युक्तिवाद ऐकूण घेण्यात आला. परंतु त्या दिवशी युक्तिवाद पूर्ण न झाल्यामुळे पुढील सुनावणी दिनांक ३१.०५.२०१८ रोजी निश्चित केली.

३) तृतीय सुनावणी दिनांक ३१.०५.२०१९ रोजी घेण्यात आली सदरच्या सुनावणीस ग्राहक सदस्य श्री प्रशांत पुजारी यांच्या आजारपणामुळे उपस्थित राहू शकले नाही. परंतु सचिव अध्यक्ष यांचेपुढे सुनावणी घेतली व ती पूर्ण न झाल्यामुळे पुढील सुनावणी घेण्याचा निर्णय घेतला गेला.

४) चौथी सुनावणी दिनांक २९.०८.२०१९ रोजी घेण्यात आली कंपनीच्या वतीने सागर मारुळकर कार्यकारी अभियंता कोल्हापूर मंडल कार्यालय, कोल्हापूर श्री एन.आर. गांधले कार्यकारी अभियंता शहर विभाग, कोल्हापूर श्री सुनिल शिंदे कार्यकारी अभियंता ग्रामिण विभाग-२ कोल्हापूर श्री मकरंद आवळेकर कार्यकारी अभियंता जयसिंगपूर विभाग तर तक्रारदार कंपनीच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी श्री प्रताप होगाडे उपस्थित होते.

सुनावणी दरम्या ग्राहक प्रतिनिधीनी तक्रारदाराचे म्हणणे मांडताना खालील मुद्दे स्पष्ट केले आहेत.

आपल्या युक्तीवादामध्ये तक्रारदाराने लिखित अभिवेदनात दिलेल्या व तक्रार अर्जाच्या नमुना 'अ' मध्ये नमूद केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने आपले निवेदन केले. ग्राहक प्रतिनिधीने त्याची विज जोडणी DDF प्रकारची नसल्याचे प्रतिपादन करताना त्याना देण्यात आलेल्या जोडणीही इतर अनेक दुस-या विज जोडण्या देण्यात आलेल्या विज वाहिनीचा आराखडा काढून तो या मंचाकडे दाखल केलेला आहे. त्यामुळे ही विज जोडणी केवळ तक्रारदारासच देण्यात आलेली नसल्याचे आग्रही म्हणणे मांडले व ही जोडणी Tapping प्रकाराने घेतल्याचेही निदर्शनास आणून दिले. परंतु विज वितरण कंपनीने DDF पध्दतीने काम करण्यास सांगितल्यामुळे ग्राहकास त्याच पध्दतीने काम करण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता असे नमूद केले. परंतु मूळातच ही वीज जोडणी Non-DDF असल्याचे स्पष्ट केले.

याबाबत मंचाने ग्राहक प्रतिनिधीस सदर खर्च परत मिळणेबाबत लगेच तक्रार का केली नाही असे विचारले असता प्रतिनिधीने खालील प्रमाणे निवेदन केले व तसेच स्वत:च्या तक्रार अर्जासोबत दिलेल्या अतिरिक्त प्रतिपादनात सुध्दा स्पष्ट केले असल्याचे निदर्शनास आणले.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

सर्वोच्च न्यायालयात खर्चाचा परतावा मिळणेबाबतचे वीज वितरण कंपनीचे अपिल प्रकरण प्रलंबित होते व त्याबाबत सर्वोच्च न्यायालयात स्थगीती दिली होती. दिनांक १० नोव्हेंबर २०१६ रोजी या अपिल प्रकरणाचा सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला व आयोगाने याबाबत दिनांक २०.०७.२०१७ च्या पत्राने वीज विततरण कंपनीस अनूसूचित नमूद केलेले चार्जेस सोडून बाकी सर्व रक्कमाचा परतावा परत देण्याचे निदेर्श दिले विज वितरण कंपनीने सुध्दा दिनांक १२ ऑक्टोंबर २०१७ रोजी अशाच प्रकारचे परिपत्रक काढले .

यानंतर दिनांक १२.०६.२०१८ रोजी तक्रारदाराने सदर परतावा मिळण्याबाबत अर्ज केला अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने तो अर्ज मुदतबाहय म्हणजेच cause of action पासून २ वर्षापेक्षा जास्त कालावधीनंतर अर्ज केला या मुद्यावर खारीज केला.

ग्राहक प्रतिनिधीने cause of action ही अंतर्गत तक्रार निवारण कक्षेच्या निर्णयाच्या दिनांकापासून पुढे दोन वर्षाकरिता असल्याचे सांगून त्यास दुजोरा देण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या HPCL व शिल्पा स्टील या निर्णयाचा आधार स्पष्ट केला परताव्याची रक्कम ही टॅरिफचा भाग आहे. आणि ती गेस बाब आहे परंतु महाराष्ट्र राज्य विज नियामक विनियम २००६ हे Procedur कार्यपध्दती बद्दल संबंधी केलेले नियम आहेत व असे Procedural Law बंधनकारक (Mandatory ) असत नाही. असेही नमूद केले व त्याकरिता सर्वोच्च न्यायालयाच्या संभाजी व इतर विरुध्द गंगाबाई व इतर या प्रकरणाच्या २० नोव्हेंबर २००८ च्या निर्णयाचा आधार घेतला. याबाबत विज अधिनियम २००३ च्या कलम ६२(सी) चा सुध्दा आधार असल्याचे नमूद केले.

त्याच वेळेस वीज वितरण कंपनीने आपल्या युक्तीवादा दरम्यान तक्रारदारास अनुक्रमे सन-२००९ व सन-२०११ वाढीव विज भार मंजूरी दिली असून अंदाजपत्रका नुसार पायाभूत सुविधेचे काम पूर्ण झालेनंतर सप्टेंबर २०१० व मे-२०१२ मध्ये जोडणीचा आदेश दिल्याचे नमूद केले. याबाबत जर तक्रारदारास पायाभूत सुविधा खर्चाबाबत तक्रार असल्यास त्यानी अंदाजपत्रक मंजूरी अथवा वीज जोडणी पूर्वी तसेच करणे आवश्यक होते. परंतु तसे तक्रारदाराने केले नसल्याचे निदर्शनास आणले त्यामुळे त्यांना DDF मंजूरी मान्य होती असे दिसून येते. असा युक्तिवाद केला .

याबरोबर या नंतर वितरण कंपनीतर्फे असाही युक्तीवाद केला की, मंचाकडे केलेली तक्रार ही मुदत बाहय असल्याचे म्हणजेच वाढीव वीज भाराची मंजूरी आदेश काढल्यापासून २ वर्षा नंतरची असल्यामुळे , महाराष्ट्र विज नियामक विनियम २००६ च्या विनियम क्र. ६.६ नुसार सदर प्रकरण मुदत बाहय आहे. व ती कायदयाने देय नाही व म्हणून परतावा देता येणार नाही. याबाबत एम.आर.सडोलकर यांच्या प्रकरणात उच्च न्यायालय नागपूर खंडपीठाने दिलेल्या न्याय निर्णयाचा त्यांनी आधार घेतला व पुढे असेही निदर्शनास आणून दिले की, जर गा-हाणे मुदतबाहय असेल तर या प्रकरणाची Merit तपासण्याची आवश्यक नाही.

## कारणमिंमासा

अशा रितीने दोन्ही बाजू ऐकून घेतल्यानंतर मंचापुढे खालील मुद्दे उपस्थित होतात.

१. मंचापुढील गा-हाणे अथवा तक्रार मुदत बाहय आहे काय?

२. तक्रारदार त्याने मागितलेले Relief मिळण्यास पात्र आहे का?

३. आदेश

याबाबत दोन्ही बाजूनी केलेल्या युक्तिवाद ,सादर केलेला दस्तऐवज पत्रव्यवहार तसेच बाजू मांडाताना मुद्दा स्पष्टकरणाकरिता आधार म्हणून घेतलेले न्याय निर्णय इत्यादी बाबी लक्षात घेता मंच खालील प्रमाणे विश्लेषण करित आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

१) तक्रारदाराने दिनांक १०.०२.२००८ व दि.२०.०५.२०११ च्या अर्जानुसार वाढीव विद्युत भार मिळावा व त्यास मंजूरी मिळावी असा अर्ज केला. तो अर्ज मंडल कार्यालय कोल्हापूर यांनी मंजूर करुन दि. ११.११.२००९ व दि. ११.०८.२०११ च्या पत्राने ३३KVA चा वाढिव भार मंजूर करण्याचे पत्र दिले.

२) त्याबाबतचे पायाभूत सूविधा उभी करण्याचे अंदाजपत्रक अनुक्रमे रु. ६,६५,७५३/- व रु. १,७८,०८५/- खर्चाची DDF योजने अंतर्गत मंजूरी दिली.

३) अंदाजपत्रकानुसार वीज जोडणी करिता लागणारे संपूर्ण पायाभूत सुविधा उभारणी तक्रारदार कंपनीने अनुक्रमे सप्टेंबर २०१० व मे-२०१२ मध्ये पूर्ण केली.

४) त्यानंतर अधीक्षक अभियंता म.रा.वि.वि.कं.मर्या. कोल्हापूर मंडल यांनी वाढिव विज जोडणी देण्याचा आदेश दिला व ऑक्टोंबर २०१० व मे-२०१२ पासून वाढिव वीज भार कंपनीला मिळू लागला.

५) त्यानंतर तक्रारदार कंपनीने खर्चाचा परतावा मिळणेबाबत दिनांक १२.०६.२०१८ रोजी अधीक्षक अभियंता म.रा.वि.वि.कं.मर्या. कोल्हापूर यांचेकडे अंदाजपत्रकीय रु. ६,६५,७५३/- व रु. १,७८,०८५/- व त्यावर बॅकेच्या व्याज दराने मागणी केली.

६) परतावा बद्दल कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे तक्रारदाराने दि. २४.०९.२०१८ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे अर्ज केला .

७) अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने त्यांच्या दि. २२.११.२०१८ च्या निर्णयाने प्रकरण महाराष्ट विद्युत नियामक आयोग विनियम २००६ च्या तरतूदीनुसार मुदतबाहय असल्याचे सांगून अर्ज निकाली काढला. यावरुन असे स्पष्ट होते की,

अ) तक्रारदाराने वाढिव विद्युत भार मंजूरी करावा म्हणून दि. १०..०२.२००८ व २०.०५.२०११ रोजी अर्ज केला . पायाभूत सुविधांचा खर्च अनुक्रमे रु. ६,६५,७५३/- व रु. १,७८,०८५/- इतक्या खर्चाचे अंदाजपत्रक DDF योजने खाली अनुक्रमें दि. ११.११.२००९ व ११.०८.२०११ रोजी दिले. तक्रारदारास सदरचे काम DDF योजने अंतर्गत मंजूर झाल्याचे पूर्ण ज्ञान होते .

ब) तक्रारदाराने हे काम कोणतीही नापसंती (protest) न दाखवता केले व अंदाजपत्रकीय सुपरव्हीजनचे चार्जेसही भरले.

क) तक्रारदार आता सर्वोच्च न्यायालयात २ वर्षाच्या परताव्याचे प्रकरण होते व त्यास स्थगिती दिलेली होती या कारणास्तव कोणतीही तक्रार करण्याची कारवाई केली नसल्याचे सांगत आहे.

ड) परवाना वितरण कंपनीने पायाभूत सुविधांचा खर्च सदर प्रकरण DDF योजने अंतर्गत असल्यामुळे ग्राहकाकडून वसूल केल्याच्या अथवा पायाभूत सुविधा उभी केलेबाबत नापसंतीची कोणतीही कृती ग्राहकाने वाढिव विद्युत भार मिळाल्याच्या तारखेपासून दोन वर्षाच्या आत केल्याचे मंचापुढे निदर्शनास आलेले नाही.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,(महाराष्ट्र विद्युत नियामक (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ च्या विनियम क्र. ६.६ ची तरतूद खालील प्रमाणे आहे.

"ज्या दिनांकास कारवाईचे कारण घडले असेल त्या दिनांकापासून दोन (२) वर्षाच्या आत जर गा-हाणे दाखल करण्यात आले नाही तर मंच असे गा-हाणे दाखल करुन घेणार नाही."

या तरतूदीमध्ये कोठेही अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने दिलेल्या निर्णयानंतर दोन वर्षे असा कोणताही उल्लेख तक्रार करण्याच्या मुदतीबाबत आढळत नाही. या कक्षाकडे जाण्याकरिता कोणतीही मुदत देण्यात आली नाही. या उपर ग्राहकाने अंतर्गत गा-हाणे निवारण कक्षाकडे तातडीने व लवकरात लवकर जाणे अपेक्षित आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. महावितरण

उच्च न्यायालय नागपूर खंडपीठाने एम.आर सलोडकर यांच्या २०१२ च्या W.P. No. १६५० या प्रकरणात निर्णित केले की, तक्रार दाखल करण्याची २ वर्षाची मुदत अंतर्गत तक्रार निवारण कक्षाच्या निर्णयाच्या तारखेपासून casue of action निर्माण झाल्याच्या तारखेपासून सुरु होते. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे तातडीने व रिझनेबल वेळेत तक्रार दाखल करणे आवश्यक आहे. एम.आर सलोडकर या प्रकरणात उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठाने त्यांच्या निर्णयात स्पष्ट केले आहे की, cause of action निर्माण झाल्या तारखेपासून दोन वर्षाच्या आंत ग्राहकाने त्याची तक्रार मंचापुढे करणे आवश्यक आहे.

परंतु अलिकडेच उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपिठाने म.रा.वि.वि.कं.मर्या. विरुध्द जवाहर शेतकरी सूत गिरणी मर्यादित या प्रकरणात दि. २१ ऑगस्ट २०१८ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयास खालील प्रमाणे स्पष्ट केले.

"Thus it is held that when a special statute presecribes a certain period of limitation for filling a particular application there under and provides in clear terms that such period on sufficient cause being shown may be extended, in the maximum only upto a specified time limit and no further then the Tribunal concerned has no jurisdiction to treat within limitation an application filed before it beyond such maximum time limit specified in the statute

If I accept the contention of the Consumer that the Cell can be approached anytime beyond २ years or ५/१० yearts.it means that Regulations ६.४ will render Regulation ६.६ and Section ४५(५) ineffective By holding that the litgation journey must reach Stage ३ (Forum) within २ years, would render a harmonious interpretation. This would avoid a conclusion that Regulation ६.४ is inconsistent with Regulation ६.६ and both these provisions can therefore coexist harmoniously."

यामुळे हा मंच अशा निष्कर्षास येत आहे की, ग्राहकाने मंचापुढे केलेली तक्रार महाराष्ट विज नियामक (ग्राहक तक्रार निवारस व विद्युत लोकपाल ) विनियम. २००६ च्या विनियमाच्या विनियम क्र. ६.६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मुदतबाहय आहे. आणि म्हणून वर नमूद केलेल्या मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

मुद्दा क्र. २ बाबत खालील प्रमाणे मंचाचा निष्कर्ष आहे.

तक्रारदाराची तक्रार ही तक्रार दाखल करण्याच्या नियमाने घालून दिलेल्या मुदतीच्या म्हणजेच cause of action निर्माण झाल्यापासून दोन वर्षाच्या कालावधीत न केल्यामुळे वैध नाही व म्हणून नामंजूर करणे आवश्यक आहे. त्यामुळे इतर मुद्याच्या बाबतीत Merit तपासण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे उपरोक्त मुद्दा क्र. २ चे उत्तरही नकारार्थी येत असल्याचा निष्कर्ष मंचाने काढला आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

सदर प्रकरणांत चार वेळा सुनावणी उपरोक्त विवेचंनात दिल्याप्रमाणे व मंचाचे पदाधिकारी बदली होणे. यामुळे तक्रार दोन ा महिन्याच्या वैधानिक कालावधीत निर्णयाप्रत येऊ शकली नाही.

## आदेश

१. प्रस्तुत तक्रार अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.
२. मुदतीत तक्रार केली नसल्यामुळे नुकसान भरपाई मागणी नामंजूर करण्यात येत आहे.
३. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

21.9.2019

(प्रशांत श. पुजारी)
सदस्य

(राजेंद्र ल. हजारे)
सदस्य सचिव

(श्रीमती पुष्पा एस तावडे)
अध्यक्ष

मी माझे स्वतंत्र मत वेगळे देत आहे.

प्रशांत पुजारी -
ग्राहक सदस्य

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

मी प्रशांत श पुजारी सदस्य, वरील निर्णयाशी सहमत नाही. माझे स्वतंत्र मत देत आहे. तो या निकालाचा भाग समजण्यात यावा. **(वेगळे मत देण्यात आलेले आहे)**

सुनावणी दरम्यान ग्राहक प्रतिनिधीने त्यांच्या वीज जोडणी DDF प्रकारची नसल्याचे प्रतिपादन करताना त्यांना देण्यात आलेल्या जोडणीही इतर अनेक दुस-या वीज जोडण्या देण्यात आलेल्या वीज वाहिनीचा आराखडा मंचासमोर सादर केला सदर वीज जोडणी DDF नुसार केवळ तक्रारदारास न देता Tapping पध्दतीने देण्यात आल्याचे सिध्द करुन निदर्शनास आणून दिले. याबाबत विज वितरण कंपनीचा कोणताही उजर आक्षेप नाही व सदर बाब विज वितरण कंपनीने मान्य केलेली आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, ग्राहकास दिलेली वीज जोडणी ही Non-DDF प्रकारची आहे. विज वितरण कंपनीने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेले सिव्हील अपिल क्र. ४३०५/२००७ मध्ये ग्राहकाने खर्च केलेल्या पायाभूत सुविधा रक्कमेच्या परतावाच्या संबंधीचा मुद्दा मा. सर्वोच्च न्यालयाने दिनांक १०.११.२०१६ रोजी फेटाळाले. त्यानुसार NDDF योजने खालील पायाभूत सुविधा , मिटरींगचे काम या करता ग्राहकाने केलेला खर्च ग्राहकाला विज वितरण कंपनीकडून परत मिळण्याचा हक्क निर्माण होतो. त्याचप्रमाणे विज वितरण कंपनीने दिनांक १२.१०.२०१७ रोजी CE/Dist.D-IV/MERC/२५०७९ या क्रमांकाचे परीपत्रक काढून SLC, ORC, Meter cost ग्राहकांना परत करण्याबाबत सुचना जारी केल्या . त्यामुळे आमचे असे स्पष्ट मत आहे की, सदर ग्राहकाने केलेला एकूण पायाभूत सुविधा खर्च रु६,६५,७५३/- व दुस-या वाढिव विज भाराकरिता रु. १,७८,०८५/- त्यावरील आतापर्यन्तचे व्याज ग्राहकास देण्यात यावे. DDF योजनेच्या राज्य वीज आयोगाच्या विविध निकालातील आणि विनियमातील स्पष्ट केलेल्या DDF च्या व्याख्येनुसार ग्राहकांना दिलेली वीज जोडणी DDF योजने खाली येत नसून ती निश्चितपणे NonDDF योजनेत बसते. त्यानुसार तक्रारदाराना त्यांनी पायाभूत सुविधाच्या साठी केलेला खर्च परत मिळण्याचा हक्क आहे. तसेच राज्य वीज आयोगाने विज वितरण कंपनीला ज्या ग्राहकाकडून विद्युत वितरण विनियम २००५ मध्ये नमूद केलेले खर्च सोडून इतर खर्च जसे की, ORC, SLC, Cost of meter , NDDF इत्यादीच्या रक्कमा व्याजासहित परत करण्या संदर्भात आदेश दिले आहेत.

मा. सुप्रिम कोर्टातील सिव्हिल अपिल क्र. ४३०५/२००७ त्याचा दिनांक १०.११.२०१६ चा आदेश त्यानंतर विज वितरण कंपनीने काढलेले परीपत्रक क्र. CE/Dist./IV/MERC/२५०७९ दिनांक १२.१०.२०१७ तसेच supply code Regulation मधील कलम १५.१ विद्युत कायदा २००३ चे ६२(६) यांच्या आधारे SLC, ORC. DDF, NDDF अशा विविध नावाने ओळखले जाणारे खर्च हे पायाभूत खर्चच आहेत. आणि ख-या अर्थाने DDF योजनेतील खर्च वगळता इतर सर्व योजनां यावर केलेला खर्च परत देणे भाग आहे कारण हा खर्च Tariff/ अंतर्गत येतो व तो विज वितरण कंपनीला त्यांच्या ARRनुसार मिळतो Infrastructure cost is a Tariff.आणि Tariff is a continuous process .म्हणून या ठिकाणी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग विनियम २००६ च्या कलम ६.६ नुसार

"ज्या दिनांकास कारवाईचे कारण घडले असेल त्या दिनांकापासून दोन (२) वर्षाच्या आत जर गा-हाणे दाखल करण्यात आले नाही तर मंच असे गा-हाणे दाखल करुन घेणार नाही."

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

हा मुद्दा गैर लागू ठरतो असे आमचे स्पष्ट मत आहे. सबब वरील निर्णयाशी सहमत नसून सदर अर्ज मंजूर करणेत यावा असा निकर्ष काढत आहोत.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

23/09/019

दिनांक : २३.०९.२०१९

( प्रशांत श. पुजारी)
सदस्य, ग्राहक तक्रार निवारण मंच कोल्हापूर

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण